**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# हॅरॉल्ड जे. लास्की यांचा हक्का संबंधीचा विचार : एक चिकित्सक अभ्यास

**प्रा.डॉ. संतोष गुणवंतराव पाटील.**
राजशास्त्र विभागप्रमुख,
दयानंद कला महाविद्यालय, लातूर. (महाराष्ट्र)

हॅरॉल्ड जे. लास्की यांचे २० शतकातील राजकीय विचारवंतामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. अनेकसत्तावादी सिंध्दाताचा प्रमुख समर्थक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी आपल्या विचाराची सुरुवात अनेकसत्तावादी विचारवंत म्हणून केली आणि शेवट लोकशाही समाजवादी म्हणून केला. त्यांच्या विचाराचा केंद्रबिदू व्यक्ती आहे. अनेक सत्तावाद व लोकशाही समाजवादाचा विचार मांडताना त्यांनी व्यक्ती स्वातंत्र्याच्या संरक्षणाचा विचार मांडला. हॅरॉल्ड लास्की हा राजकीय विचारवंता बरोबर एक कुशल प्राध्यापक, पक्षाचा नेता, सार्वजनिक वक्ता होता. यावरुन त्यांचे व्यक्तित्व बहुमूखी असल्याचे लक्षात येते.

लास्कीचा जन्म ३० जून १८९३ रोजी इंग्लंडमधील मॅचेस्टर येथे ज्यू कुटुंबात झाला. त्यांचे वडील नैथन लास्की आपल्या बुध्दिमान व प्रतिभाशाली मुलाला आदर्श ज्‍यू (यहुदी) बनवू इच्छित होते. परंतू लास्कीला धार्मिक कर्मकांडा ऐवजी आधुनिक ज्ञान-विज्ञानामध्ये जास्त आवड होती. त्याने आपल्या वडीलांच्या इच्छेविरुध्द धार्मिक बंड करुन आपल्या पेक्षा आठ वर्षे वयाने मोठी असलेल्या फ्रिडा केरी या ख्रिश्चन मुलीशी विवाह केला. यावरुन तो लहानपणापासून क्रांतिकारी व विज्ञानवादी असल्याचे दिसून येते. या आंतरधर्मिय विवाहामुळे नैथन लास्की नाराज झाले आणि त्यांनी लास्कीचा आर्थिक पुरवठा बंद केला. तसेच कालातरांनी आपल्या संपत्तीचा उत्तराधिकारी म्हणून मान्यता देण्यासाठी फ्रिडा केरी नी ज्यू धर्म स्वीकारण्याची अट टाकली त्यामूळे कुटुंबात धार्मिकवाद सुरु झाला. फ्रिडा केरीची वैचारिक प्रगल्भता चांगली होती. कुटुंबातील धार्मिकवाद संपुष्टात आणण्यासाठी तिने ज्यू धर्माचा स्वीकार केला.

लास्कीने सुरुवातीला वृत्तपत्रामध्ये लेख लिहून पैसे कमावले. १९१४च्या पहिल्या महायुध्दाच्या वेळी लास्कीची सैन्यामध्ये भरती होण्याची इच्छा होती. पण शारिरीकदृष्टया कमकुवत असल्यामुळे आरोग्य चाचणीत कमकुवत ठरला. कालांतराने त्यांनी कॅनडामधील मॅकगील विद्यापीठात इतिहासांचा प्राध्यापक म्हणून कार्य केले. एका वर्षानंतर अमेरिकेतील हार्वर्ड विश्वविद्यालयात प्राध्यापकाची नौकरी प्राप्त केली. १९२० मध्ये इंग्लडला येऊन लंडन ऑफ इकॉनॉमिक्स अॅन्ड पॉलिटिक्स या संस्थेत नौकरी करुन डायरेक्टर पद प्राप्त केले व आयुष्याचे ३०वर्षे या संस्थेत घालवले. लास्की विद्याप्रिय विद्यार्थी होते अनेक देशात त्यांचे विद्यार्थी होते. भारताचे पंतप्रधान प. नेहरु, कृष्ण मेनन, अमेरिकेचे अध्यक्ष केनेडी सारखे त्यांचे विद्यार्थी होते. लास्कीच्या लोकशाही समाजवादाचा प्रभाव पं. नेहरुवर होता. लास्कीने मजूर पक्षात ही काम केले. १९४५ मध्ये ते मजूर पक्षाचे अध्यक्ष होते. वयाच्या ५६ व्या वर्षी १९५० मध्ये लास्कीचे निधन झाले.

लास्कीच्या काळात युरोपमध्ये उदारमतवाद, उपयुक्ततावाद, समाजवाद, भांडवलवाद, साम्यवाद इत्यादी अनेक विचारप्रणाली प्रचलित होत्या. भांडवलशाहीतून निर्माण झालेली विषमता त्यांनी पाहिली होती. नाझीवाद व लोकशाहीतील जीवनविषयक मूल्याचा संघर्ष त्यांनी अनुभवला होता. याचा परिणाम लास्कीच्या विचारावर पडला. भांडवलशाही विरुध्द क्रांती करुन समाजवादाची निर्मिती करण्याच्या दृष्टीने कार्ल मार्क्सनी सांगितलेल्या तत्वज्ञानाचा प्रभाव लास्कीवर पडला. परंतू त्यांनी मार्क्सवाद पूर्णपणे स्वीकारला नाही. मार्क्सवादाच्या मर्यादा ओळखून त्यांनी भांडवलशाहीला विरोध केला. १९३४ मध्ये त्यांनी रशियाला भेट देऊन मार्क्सचे तत्वज्ञान प्रत्यक्ष व्यवहारात आल्याचे पाहिले. जॉन ऑस्टीन यांनी सार्वभौम सत्तेचा एकसत्तावादाचा सिध्दांत मांडला. त्यावर लास्की यांनी टीका करुन अनेकसत्तावदाचा विचार मांडला. लास्कीच्या कालखंडात इंग्लंड मध्ये लोकशाही शासन व्यवस्थे बरोबर भांडवलशाहीची अर्थव्यवस्था होती. त्याचाही परिणाम लास्कीच्या विचारावर पडला.

लास्की यांनी विविध विषयावर अनेक पुस्तके व लेख लिहिले असले तरी The Problem of Sovereignt, Authority in the modern state या ग्रंथात हक्का संबंधीचा विचार सांगितलेला आहे. लास्कीच्या मते, ज्या सामाजिक परिस्थितिशिवाय व्यक्तीला आपला सर्वांगीन विकास साधता येणार नाही. त्या परिस्थितीस हक्क असे म्हणतात. लास्कीनी रशियाला भेट देवून आल्यावर समाजवादाचे समर्थन केले असले तरी त्यांचा पिंड लोकशाहीचा असल्यामुळे व्यक्तीच्या अधिकार, स्वांतत्र्य, समतेसंबंधी प्रभावीपणे

विचार मांडला आहे. विसाव्या शतकातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक परिस्थितीचे अवलोकन करुन त्यांनी हक्काचा विचार पुढील प्रमाणे मांडला आहे.

प्रो. लास्कीच्या मते, हक्काचे स्वरुप ऐतिहासिक व नैसर्गिक आहे. याचा अर्थ हक्क हे एका विशिष्ट काळात प्राप्त झाले आहेत असा नाही. तर विशिष्टवेळी समाजाची संस्कृति आणि समाजाची गरज या आधारावर त्याची मागणी होते. समाजाशिवाय अधिकाराची किंमत शून्य असते. अधिकाराचा वापर करण्यासाठी समाजाची आवश्यकता असते. एखाद्या ठिकाणी व्यक्ती एकटाच असेल तर तिथे त्याच्या बोलण्याचा, भाषणाचा , सभा घेण्याचा अधिकारास काहीच किंमत रहात नाही. अधिकार हे देश , काळ, परिस्थितीनुसार बदलत असतात. वेळ व स्थानानुसार अधिकार ठरत असतात. समाजाच्या आवश्यकतेप्रमाणे, गरजेप्रमाणे, त्यामध्ये बदल होऊ शकतो. पूर्वी स्त्रियांना अनेक हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते आज त्यात परिवर्तन होऊन पुरुषाप्रमाणे स्त्रियांना विविध क्षेत्रात बरोबरीचा अधिकार प्राप्त झाला आहे. असे असले तरी हक्काचा कल स्थायी स्वरुप धारण करण्याकडे असतो. असे लास्की यांचे मत आहे. अधिकार व कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू असून ते परस्परावर अवलंबून असतात. तसेच परस्परपूरक असतात. अधिकार हे सामाजिक स्वरुपाचे असल्यामुळे त्याचा संबंध इतर व्यक्तीशी येतो. मी बोलण्याचा हक्क वापरत असेल तर माझे बोलणे ऐकून घेणे हे दुसऱ्या व्यक्तीचे कर्तव्य ठरते. तसेच दुसरा एखाद्या व्यक्ती बोलत असेल तर त्याचे बोलणे मी ऐकून घेणे हे माझे कर्तव्य ठरते. व्यक्तीला केवळ अधिकार किंवा केवळ कर्तव्य पाळून चालत नाही. व्यक्ती फक्त अधिकारच दिले तर समाजात अराजकता, गोधंळ, गड्बड निर्माण होते आणि व्यक्ती कर्तव्याचे पालन करु लागला तर समाजात गुलामगिरी निर्माण होते ही परिस्थिति टाळण्यासाठी प्रत्येकाला अधिकार व कर्तव्य दिले पाहिजेत. हक्काचे स्वरुप स्पष्ट करताना प्रो. लास्की यांनी वरील घटकांशिवाय इतरही काही घटक सांगितले आहेत. त्यात उपयोगिता हा अधिकाराचा मूळ आधार आहे. अधिकाराच्या उपयोगितेवरुन त्याचे महत्त्व स्पष्ट होते, व्यक्तीचे अधिकार समानच असले पाहिजेत, राज्याकडून नागरिकांना किती अधिकार दिले जातात त्यावरुन राज्याचे श्रेष्ठत्व ठरते, अधिकाराचे संरक्षण करणे ही राज्याची जबाबदारी असते, अधिकारातून व्यक्तीची नैतिक प्रगती होत असते इत्यादीचा समावेश होतो.

व्यक्ती विकासासाठी आवश्यक असणाऱ्या काही अधिकारांचा उल्लेख प्रो. लास्की यांनी केला आहे. काम करण्याचा हक्क प्रत्येकाला असला पाहिजे त्याशिवाय व्यक्तीचा परिपूर्ण विकास होऊ शकत नाही. किंवा व्यक्ती आपली योग्यताही दाखवू शकत नाही. कामाचे तास, विश्रांती निश्चित झाली पाहिजे. लास्की यांनी भांडवलशाहीची व्यवस्था पाहिली होती. कामगारांना जास्त काम व कमी वेतन देवून त्यांचे शोषण केले जात होते हे शोषण दूर करण्यासाठी त्यांनी ठराविक तास काम करण्याच्या व विश्रांती घेण्याच्या अधिकाराचे समर्थन केले. समाजात प्रत्येक व्यक्तीला त्याच्या पात्रतेवरुन किंवा त्याच्या कामावरुन योग्य वेतन मिळाले पाहिजे. कोणत्याही व्यक्तीचे आर्थिक शोषण होवू नये. काम जास्त व वेतन कमी असू नये. वेतनातूनच व्यक्ती आपल्या मूलभूत गरजापूर्ण करु शकतो म्हणून प्रत्येकाला आपल्या कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. योग्य वेतन याचा अर्थ सर्वांना समान वेतन असा नाही. लास्कीच्या मते व्यक्तीला निश्चित वेळ काम करण्याचा अधिकार आहे. भांडवलशाही व्यवस्थेत व्यक्तीकडून रात्र ना दिवस काम करुन घेतले जात होते. त्यामुळे कामगारावर अन्याय होत होता. तो दूर करण्यासाठी लास्कीने कामाचे तास निश्चित झाले पाहिजेत असा विचार मांडला.

शिक्षणाचा अधिकार हा सर्वात महत्त्वाचा आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या अधिकार व कर्तव्याची जाणीव होते. लोकामध्ये जागृती निर्माण होऊन व्यक्ती ज्ञानी बनतो. आदर्श नागरिक निर्माण होतो. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला किमान प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मिळाले पाहिजे. सरकारनी ती व्यवस्था केली पाहिजे. असे लास्की यांचे मत आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत राजकीय अधिकार हा महत्त्वाचा असतो. लोकशाहीत जनतेकडून निवडून दिलेल्या प्रतिनिधीच्या हातामध्ये सत्ता असते. जनतेला सरकारमध्ये सहभागी होण्यासाठी किंवा प्रतिनिधीची निवड करण्यासाठी राजकीय अधिकाराची आवश्यकता असते या अधिकारात मतदान करणे, निवडणूकीला उभा राहणे, सरकारी पद प्राप्त करणे इत्यादी अधिकराचा समावेश होतो. जात, धर्म, वंश, लिंग, प्रांत, गरीब श्रीमंत असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान अधिकार मिळाला पाहिजे असे मत मांडून लास्की यांनी सार्वत्रिक मतदानाचे प्रभावीपणे समर्थन केले आहे.

लोकशाही व्यवस्थेत भाषण स्वातंत्र्याचा अधिकारही महत्वाचा असतो. व्यक्तीला भाषण करण्याचा अधिकार नसेल तर राजकीय अधिकाराला काहीच महत्व राहत नाही. सरकारच्या धोरणावर टीका टिपण्णी करण्यासाठी अनुकूल प्रतिकुल मत व्यक्त करण्यासाठी लोकांना भाषण करण्याचा अधिकार असला पाहिजे. अधिकारामुळे व्यक्तीचा विकास होतो. विचार स्वातंत्र्य, चर्चा स्वातंत्र्य आणि

अभिव्यक्ती स्वातंत्र्याला लोकशाहीमध्ये मोलाचे स्थान प्राप्त होते. व्यक्तीला आपल्या विकासासाठी मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी संपत्तीची आवश्यकता असते. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला संपत्ती कमावण्याचा व खर्च करण्याचा अधिकार असला पाहिजे. याचे समर्थन प्रो. लास्की यांनी केले आहे. परंतु गरजेपेक्षा जास्त संपत्ती असू नये, त्यांना जास्त संपत्ती बाळगण्याचा अधिकार नसावा कारण त्यांनी गरजेपेक्षा जास्त संपत्ती ठेवल्यास भयानक स्वरुपाची भांडवलशाही निर्माण होते. हे लास्कीने पाहिले होते. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या विकासासाठी संघटना, संस्था, गट, मंडळे स्थापन करण्याचा व सभा घेऊन त्यातून आपले विचार व्यक्त करण्याचा अधिकार आहे. कायदेशीर रित्या सभा घेण्याचा व संघटना स्थापन करण्याचा अधिकार प्रत्येकाला असला पाहिजे. या अधिकारामुळे विचारांचे आदान प्रदान करता येते, सरकारपर्यंत आपल्या अडचणीपोहचविता येतात, व्यक्तीवर झालेला अन्याय, अत्याचार दूर करता येतो असे लास्की यांनी आपल्या लीबर्टी इन मॉडर्न स्टेट या पुस्तकात मत व्यक्त केले आहे.

समाजातील कोणत्याही व्यक्तीवर अन्याय, शोषण, पिळवणूक होता कामा नये. व्यक्तीवर अन्याय झाल्यास अन्यायाविरुद्ध न्यायालयात दादा मागण्याचा अधिकार व्यक्तीला असला पाहिजे. जात, धर्म, वंश, प्रांत, लिंग, श्रीमंत-गरीब इत्यादीच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे. व्यक्तीच्या विकासासाठी देशात शांतता सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक ती बाहय परिस्थिती निर्माण करणे हे राज्याचे महत्वाचे कार्य आहे. हे कार्य राज्याकडून योग्य रितीने पूर्ण केले जात नसेल, तसेच व्यक्तीच्या अधिकाराला राज्याकडून मान्यता मिळत नसेल तर राज्याला विरोध करण्याचा अधिकार व्यक्तीला असला पाहिते. क्रांती करुन व्यक्तीनी आपले अधिकार प्राप्त केले पाहिजेत. क्रांतीमुळे समाज व राज्यातील दोष दूर होऊन नवीन समाज रचना निर्माण होते असे लास्की यांचे मत आहे. राज्याने निर्माण केलेला कायदा व्यक्ती विकासासाठी योग्य असेल तरच त्याचे पालन करावे अन्यथा त्यास विरोध करावा असे लास्की यांचे मत आहे. थोडक्यात सरकार व्यक्तीच्या हिताचे रक्षण करीत नसेल तसेच अधिकारांचे अपहरण करीत असेल तर सरकारला विरोध करावा असे लास्की यांचे मत आहे. प्रो. लास्की यांनी अधिकाराच्या स्वरूप व प्रकाराबरोबर अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी तीन उपाय सुचविले आहेत.

१. राज्यातील सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. समाजातील जास्तीत जास्त लोकांना सत्तेमध्ये सहभागी करून घ्यावे. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे निरंकुश व्यवस्थेचा उदय होवून जनतेवर अन्याय अत्याचार होतो. त्यामुळे लास्कीने अधिकाराच्या संरक्षणासाठी सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा उपाय सुचविला आहे.
२. सरकारचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी सरकारच्या प्रत्येक खात्यात एक सल्लागार समिती असावी असे लास्की यांचे मत आहे.
३. व्यक्तीच्या दैनंदिन व्यवहारात व त्यांनी स्थापन केलेल्या संघटनेत राज्यानी कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करु नये. राज्याची भूमिका अहस्तक्षेपाची असावी असे लास्की यांचे मत आहे.

व्यक्तीच्या विकासासाठी व कल्याणासाठी अधिकाराची आवश्यकता असते. अधिकाराशिवाय व्यक्तीचा विकास होऊ शकत नाही. समाजाने व राज्याने मान्य केलेल्या व्यक्तीच्या नैतिक कृतीस अधिकार म्हटले जाते. अधिकारास राज्याकडून संरक्षण प्राप्त होते. राज्याकडून व्यक्तीच्या हक्काचे किती प्रमाणात संरक्षण केले जाते यावरुन त्या राज्याचा दर्जा ठरत असतो. अधिकार, स्वातंत्र्य, समता व न्याय ही लोकशाहीची मूल्ये आहेत. लोकशाहीच्या यशासाठी अधिकाराची आवश्यकता असते. याचा विचार करुन लास्कीने अधिकाराचे प्रभावीपणे समर्थन केले. लास्की यांनी प्रतिपादन केलेला शिक्षणाचा, काम करण्याचा, योग्य वेतनाचा, संपत्तीचा, भाषणाच्या अधिकाराबरोबर राजकीय अधिकार व्यक्तीसाठी व लोकशाहीच्या यशासाठी महत्वाचा आहे. त्यातूनच त्यांच्या विचाराची प्रस्तुतता दिसून येते.

संदर्भ ग्रंथ :

१. बी. एल. फाडिया - आधुनिक राजनीतिक चिन्तक का इतिहास (बेंथम से वर्तमान), साहीत्य भव पब्लिकेशन, आगरा - २०००.
२. जीवन मेहता - राजनीतिक चिन्तक का इतिहास, साहीत्य भवन पब्लिकेशन, आगरा - २०००.
३. डॉ. प्रभुदत्त शर्मा - पाश्चात्य राजनीतिक विकास का इतिहास, कॉलेज बुक डेपो, जयपूर - २००९.
४. डॉ. सुधाकर ग. जोशी - पाश्चात्य राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद - २०१६.
**5.** डॉ. वा. भा. पाटील - पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर - १९९९.